# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 24/08/2021 (मंगळवार)
(दुपार)

---

### अपघातात मृत्यू

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 4 कि. मी. अंतरावरील मौजा पोल्ट्री फॉर्म सेलु जवळ रिंगरोड येथे दिनांक 23/08/2021 चे 15:15 वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रफुल्ल दशरथ रंगारी, वय 28 वर्ष, रा. सेलु वार्ड क्र 3 हा त्याच्या एमएच– 40/ बिव्ही– 7841 क्रमांकाच्या मोटरसायकलवर निळकंठ संतोष चामलाटे(मृतक), वय 68 वर्ष, रा. सेलु यास डबलसिट बसवुन कळमेश्वर वरून सेलु येथे जात होता. त्यादरम्यान सीजी– 04/जेडी– 2027 क्रमांकाचा ट्रकचा चालक आरोपीने आपले ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीच्या मोटरसायकला मागुन धडक दिली. या अपघातात फिर्यादी व मृतक खाली पडल्याने त्यात मृतक याच्या डोक्याला मार लागुन गंभीर दुखापत झाली व नाका तोंडातुन रक्त निघाले. त्यास उपचाराकरीता ग्रामीण रूग्णालय कळमेश्वर येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन त्यास मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. 184, 134/177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. प्रविण मुंढे हे करीत आहे.

.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर